MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

---

ग्राहक तक्रार क्र. २८–०९/ दिनांक :

१) श्री. दादू सिध्दा हक्के,
रा. व्हसपेठ ( राजोबाची वाडी), ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली — विरूध्द पक्षकार

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली

**<u>कोरम</u> :–** १) श्री. के.वाय. जगताप, अध्यक्ष,
२) श्री. एस.आर. बांबळे, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. एस.आर.बांबळे, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच यांचे तर्फे दिनांक : ११.०५.२००९

ग्राहक श्री. दादू सिध्दा हाके, रा. व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली तक्रार क्र. २८/०९ यांनी त्यांचे तेथील शेतीपंप कनेक्शनला वीज मीटर बसवून मीटर पध्दतीत बील मिळावे अशी वि.प.कडे मागणी केली आहे. अद्याप मीटर बसविला नाही अशी तक्रार आहे.

तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांजकडे प्रकरण क्र. ८१३ दि. ७.२.२००९ ने क्ष नमुना अर्जात तक्रार दाखल केली होती. त्याबाबत कक्षात सुनावणी होऊन आदेश क्र. २४९९ दि. १८.३.२००९ ने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नसलेने ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांजकडे दि. १५.४.२००९ रोजी अपील दाखल केले आहे. त्यावर मंचाने संबंधितांकडून मुद्देनिहाय अहवाल मागविला व दि. ५.५.२००९ रोजी सुनावणी सांगली येथे ठेवली.

सुनावणीवेळी तक्रारदार किंवा प्रतिनिधी हजर नव्हते. वि.प.तर्फे श्री. बी. बी. भोसले, कार्यकारी अभियंता, श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महंकाळ विभाग व श्री. दिवटे, सहाय्यक अभियंता, संख उप विभाग इ. हजर होते.

<u>तक्रारदाराची तक्रार</u>

तक्रारदार यांचे व्हसपेठ, ता. जत, जि. सांगली येथे शेती वीजपंप जोडणी आहे. सदर जोडणीस वीज मीटर बसवून मिळावा अशी वितरण कंपनीकडे मागणी केली. त्यावर वितरण कंपनीने बिलींगचे तिमाही काल सुरु होणेचेवेळी म्हणजे दि. १.४.२००९ ला मीटर बसविणेत येईल असे कळविले. परंतु अद्याप मीटर बसविला नाही तो बसविण्यात यावा व मीटर प्रमाणे बील आकारणी व्हावी अशी मागणी केली.

<u>वितरण कंपनीचे म्हणणे</u>

तक्रारदाराचे शेतीपंप वीज जोडणीस मीटर बसविणेचे मागणीवर वि.प.ने सांगितले मीटर उपलब्ध नसलेने दि. १.४.२००९ ला मीटर बसविला नाही. तथापि त्यानंतर दि. १७.४.२००९ रोजी मीटर बसवून तक्रार निवारण करण्यात आली आहे व त्याप्रमाणे कार्यवाही झाली असलेबाबत ग्राहकाचे पत्र दि. १७.४.२००९ चे सादर करण्यात आले.

<u>सदस्य सचिव यांचा निष्कर्ष</u>

तक्रारदाराचे त्यांचे शेतीपंपास वीज मीटर बसवून त्यास मीटर पध्दतीने वीज बील मिळावे हि मागणी आहे. वितरण कंपनीने दि. १.४.२००९ ला मीटर बसविण्याचे आश्वासन देवूनही कंपनीचे म्हणण्यानुसार मीटर उपलब्ध नव्हता त्यामुळे दि. १.४.२००९ नंतर दि. १७.४.२००९ ला मीटर बसविला व त्यानुसार तक्रारीचे निवारण झालेले आहे. तक्रारदाराचे एस.ओ.पी.नुसार कार्यवाही किंवा नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी आहे. वि.प.ने कार्यवाही केलेली असलेमुळे नुकसान भरपाईचा मुद्दा निकालात निघतो.

दोन्ही बाजूंचे म्हणणे, उपलब्ध कागदपत्रे, पुरावे विचारांत घेऊन सदस्य सचिव यांजकडून खालील प्रमाणे आदेश देणेत येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१) तक्रारदाराचे अपील फेटाळणेत येत आहे.

२) भरपाईचा आदेश नाही.

३) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ११.०५.२००९

( एस. आर. बांबळे )
सदस्य सचिव

श्री. काकासाहेब य. जगताप, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :